# महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग
## वैदयकिय अधिकारी (गट-अ) ची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासाठी पदभरती जाहिरात

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रंमाक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३/ दि.०२/०३/२०१५

२)शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रंमाक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३/ दि.२१/०४/२०१५

३)शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रंमाक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३/ दि.०३/१२/२०१८

४)शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रंमाक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/भाग - २/सेवा-३/ दि.०४/०७/२०१९

---

जाहिरात क्रमांक :- ०१ दि.०१/०८/२०१९

---

१) सोलापूर जिल्हातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैदयकिय व आरोग्य सेवा गट-अ, संवर्गातील वैदयकिय अधिकारी या पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी भरतीकरीता एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) पदसंख्या -

- प्राथमिक आरोग्य केंद्रात भरावयाची कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे - ६०
- ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात भरावयाची कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांचे पदे - ३१
- एकुण भरावयाची कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांचे पदसंख्या - ९१
- वर नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. पदे कमी अथवा जास्त होऊ शकतात.

३) वेतन - कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना एकत्रित मानधन दरमहा ४०,०००/- रुपये राहील.

४) वय -
दिनांक ३१ जुलै २०१९ रोजी ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५) शैक्षणिक अर्हता :-
५.१ सांविधानिक विद्यापिठाची एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस पदवी

६)निवड प्रक्रिया :-

एकुण :- १०० गुण

| तपशिल | एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणाचे प्रमाण |
|---|---|
| पदवी परीक्षेच्या अतिंम वर्षामध्ये मिळालेले एकत्रित गुण | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) |
| शासन सेवेत वैदयकिय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रीत स्वरुपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकूण वर्षे | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| एकुण गुण | १०० |

७) अटी व शर्ती :-

१) शासकीय आरोग्य संस्थामधील कामाचा अनुभव मुल्याकंनासाठी विचारात घेण्यात येईल.

२) उमेदवाराने सक्षम प्राधिका-याने दिलेले शासकीय आरोग्य संस्थेत काम केलेले अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबधित संस्था/कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील

३) उमेदवाराची सेवा प्रत्येक सहामाहिमध्ये मोजण्यात येईल. सहा महिन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण देण्यात येणार नाहीत.

४) अनुभवासाठीच्या गुणांच्या मुल्यांकनासाठी ३० जुलै २०१९ अंतिम दिनांक राहील.

५)निवड प्रक्रियेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषानुसार गुणांचे मुल्याकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकिंत प्रती उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा अर्ज रददबातल करण्यात येईल.

६)प्राप्त अर्जाची छाननी करुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

७) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येईल.

८) नवनियुक्त वैदयकिय अधिका-यासाठी मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

९) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकीय नियमित कर्मचा-याप्रमाणे कोणतेही फायदे  मिळण्यास पात्र असणार नाहीत.

१०) उपलब्ध रिक्त पदे विचारात घेऊन पदव्युत्तर पदवी/पदविका धारकांना प्राध्यान्य देण्यात येईल.

११)ज्या रिक्त ठिकाणी एम.बी.बी.एस/पदव्युत्तर पदवी/पदविका (विशेशतज्ञ) धारक उपलब्ध होणार नाहीत. त्या रिक्त ठिकाणी एम.बी.बी.एस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल.एम.बी.बी.एस अर्हताधारक उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल. तदनंतरदेखील कंत्राटी एम.बी.बी.एस उमेदवार उपलब्ध झाल्यास आपली सेवा अपोआप संपुष्टात येंईल. सदरची सेवा समाप्त करताना जो वैद्यकीय अधिकारी शेवटी हजर झालेला आहे त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. व इरत ठिकाणी रिक्त असल्यास त्याठिकाणी नियुक्ती देण्याबाबत प्राध्यान्य देण्यात येईल.

१२) नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांनी एक महिना आधी संबधित खातेप्रमुखाकडे लेखी पुर्वकल्पना सादर करुन राजीनामा मंजूरीनंतर कार्यमुक्त होऊ शकतील. पुर्वकल्पना न सादर करता गैरहजर अथवा राजीनामा सादर केल्यास एक महिन्याचे आगाऊ वेतन भरावे लागेल.

१३) खालील कारणास्तव कोणतेही पुर्व सुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

१३.१ ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधी गैरहजर.

१३.२) कामामध्ये निष्काळजीपणा

१३.३) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

१३.४) कामकाजात अकार्यक्षम असणे, सेवेची कर्तव्य व जबाबदारी कटाकक्षाणे न पाळणे.

१३.५) गैरवर्तन/गैरव्यवहार केलेले निदर्शनास आल्यास

१४) कार्यरत पदावर बधपत्रित वैद्यकीय अधिकारी अथवा नियमित वैद्यकीय अधिकारी बदलीने/नियुक्तीने हजर झाल्यास सेवा अपोआप संपुष्टात येईल.

१५) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती झाल्यानंतर वरील कारणास्तव एकदा कार्यमुक्त केल्यानंतर कोणत्याही सबबीवर पुन्हा सेवेत नियुक्ती मिळणार नाही.

१६) या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१७)शासन सेवाशर्तीखालील हि सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भिविष्य निर्वा निधी अथवा तत्सम कोणतेही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१८) सदर पद हे कंत्राटी स्वरुपातील असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात कोणतेही अधिकार सांगणार नाही व त्यासाठी आंदोलन /संप/बंद करणार नाही व त्यामध्ये भाग घेणार नाही. अशा आशयाचे र.रु.१०० चे बंधपत्र देण्यात यावे.

१९) वरील अटी व शर्तीमध्ये बदली करण्याचे अधिकारी समीतीकडे राखीव राहतील.

८) सर्वसाधारण :-

०८.१ निवड झालेल्या सहा महिन्याच्या आत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र,  तीन महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

०८.२  निवड झालेल्या उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यावसाय करता येणार नाही.

०८.३ निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडिकल कोन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र) एक्स.एल.व्हि. आय.( १९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ ( १९५६ चा १०२) व

महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडिसीन यांच्याकडे नोंदणी असणे आवश्यक आहे.

९) महत्वाचे.

कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१०) अर्ज :-

१०.१ उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शुल्काचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्षे (डीमांड ड्राप-ट) प्रशासनाधिकारी जिल्हा.कु,नि.ब्युरो जि.प. सोलापूर यांच्या नांवे काढून अर्जासोबत जोडावा आणि संपूर्ण भरलेल्या अर्ज नमूद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित छायाकिंत प्रती व प्रतिज्ञापत्र त्यासोबत जोडावे.

१०.२ मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.

१०.३ ऑनलाईन अर्जाच्या उपलब्धतेसबंधी कोणतीही अडचण असल्यास उमेदवाराने दूरध्वनी क्रमांक ०२१७ - २७२६५७८ वर संपर्क साधावा.

११) शुल्क :-

अ. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठी :- रक्कम रुपये - २००/-

ब. मागासा प्रवर्गाच्या उमेदवारासाठी :- रक्कम रुपये - १००/-

क. फक्त राष्ट्रीयकृत बॅंकंच्या डीमांड ड्राप-टव्दारे शुल्क अदा करण्यात यावे.

१२) सदर पदभरती वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

१२.१ एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस अर्हताधारक अर्ज मागविण्याचे अंतिम दि.०८/०८/२०१९ सांय ०५:०० वाजेयर्पत

१२.२ एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस उमेंदवाराचे संभाव्य पात्र/अपात्र यादी प्रसिध्द करणे दि.१३/०८/२०१९

१२.३ अपात्र उमेंदवाराची हरकती मागविण्याचे दि.१३/०८/२०१९ व दि.१४/०८/२०१९

१२.४ अंतिम पात्र उमेदवारची यांदी दि.१४/०८/२०१९ रोजी सांय ०५:०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१२.५ एम.बी.बी.एस अंतिम पात्र उमेदवारांची मुलाखत दि.१९/०८/२०१९

१२.६ बी.ए.एम.एस अंतिम पात्र उमेदवारांची मुलाखत दि.२३/०८/२०१९

१३) सदरच्या रिक्त पदावर एम.बी.बी.एस उमेदवार उपलब्ध झाल्यास बी.ए.एम.एस उमेदवारांची भरती प्रक्रिया रदद करण्यात येईल. मुलाखत रदद झाल्यास त्याबाबत शुध्दीपत्रक दि.२०/०८/२०१९ रोजी केवळ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी स्वरुपात पदभरती करण्याकरिता मा.अध्यक्ष, निवड समिती तथा मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या नावे मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कार्यालयाकडे अर्ज सादर करण्यात यावेत.

१५) एकुण रिक्त पदांच्या २० टक्के पदे प्रतिक्षा यादीमध्ये राहतील व हि प्रतिक्षायादी एक वर्षेच्या कालावधीसाठी वैद्य राहील. नियुक्त कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवेतुन कमी केल्यास किंवा राजीनामा दिल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेनुसार रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येईल. तसेच प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने निर्गमित होतील.

स्थळ :- सोलापूर<br>
दिनांक :- ०१/०८/२०१९

सदस्य सचिव<br>
जिल्हा निवड समिती<br>
तथा<br>
जिल्हा शल्यचिकित्सक,<br>
सोलापूर

| | |
|---|---|
| | # आरोग्य विभाग जिल्हा परिषद सोलापूर |
| कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी उमेदवारांने करावयाचा अर्ज नमुना | |
| शैक्षणिक अर्हता पुढील रकान्यात नमुद करावा | |

दिनांक :- /०८/२०१९

प्रति,

मा.अध्यक्ष निवड समिती तथा

मा.जिल्हाधिकारी, सोलापूर

व्दारा,

मा.जिल्हा आरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद, सोलापूर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | उमेदवारांचे संपुर्ण नाव (अडनाव प्रथम) | | | |
| ०२ | सध्याचा पत्ता | | | |
| ०३ | कायमचा पत्ता | | | |
| ०४ | उमेदवारांचे नागरीकत्व (महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ) | | | |
| ०५ | दुरध्वनी क्रमांक (मो.नं) | | | |
| ०६ | स्त्री/पुरुष | | | |
| ०७ | जन्म दिनांक (शालांत प्रमाणप्रत्रानुसार ) | दिवस | महिना | वर्षे |
| | | | | |
| ०८ | दि.३० जुलै २०१९ रोजीचे वय | वर्षे | महिना | दिवस |
| | | | | |
| ०९ | जातीचा प्रवर्ग | | | |
| १० | धानकर्षे (डिमांड ड्रॉप-ट) माहिती | | | |

| धानकर्षे (डिमांड ड्रॉप-ट) क्रमांक | रक्कम | राष्ट्रीयकृत बॅकेचे नांव |
|---|---|---|
| | | |

| ११ | शैक्षणिक पात्रता - पदवी/पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र व प्रयत्नाचे प्रमाणत्र | | | |
|---|---|---|---|---|
| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल (शैक्षणिक पात्रता) | उतीर्ण वर्षे | विद्यापिठाचे नांव | एकुण गुण | टक्केवारी |
| | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | पदवी/पदविका परिक्षेत सर्व वर्षात मिळालेले एकत्रित गुण व टककेवारी | एकत्रित गुण | टककेवारी |
| | | | |
| १३ | पदवी/पदविका परिक्षेत अंतिम वर्षात मिळालेले एकत्रित गुण व टककेवारी | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | इतर शैक्षणिक अर्हता | | | | |
| १५ | एम.एम.सी/एम.सी.आय.एम नोंदणी प्रमाणपत्र | | आहे/नाही | | |
| १६ | केवळ शासकीय आरोग्य संस्थेत सेवा केली असल्यास खालील तक्तात माहिती नमुद करावी. | | | | |
| (दि.३० जुलै २०१९ रोजी पर्यंतचा कालावधी वैद्य राहील.) | | | | | |
| अ.क्र | आरोग्य संस्थेचे नांव | धारण केलेले पद | सेवा कालावधी | | |
| | | | पासुन | पर्यंत | |
| १६.१ | | | | | |
| १६.२ | | | | | |
| १६.३ | | | | | |
| १६.४ | | | | | |
| १६.५ | | | | | |
| १६.६ | | | | | |

| केवळ शासकीय आरोग्य संस्थेत सेवा केलेला एकुण कालावधी | | |
|---|---|---|
| वर्षे | महिना | दिवस |
| | | |

| अ.क्र. | खालीलप्रमाणे कागदपत्रे सोबत सादर केलेले | आहे. | नाही. | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| १७.१ | पदवी सर्व वर्षोचे गुणपत्र | | | |
| १७.२ | उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |
| १७.३ | प्रयत्नाचे प्रमाणपत्र (अटेंम्ट प्रमाणपत्र | | | |
| १७.४ | एम.एम.सी/एम.सी.आय.एम नोंदणी प्रमाणपत्र | | | |
| १७.५ | शासकीय आरोग्य संस्थेत केलेल्या कामाचा प्रमाणपत्र | | | |
| १७.६ | ओळखपत्र (उदा - आधार कार्ड, पॅन कार्ड,) | | | |
| १७.७ | जातीचा दाखला | | | |
| १७.८ | जात पडताळणी प्रमाणपत्र | | | |
| १७.९ | नॉन क्रिमीलीयर प्रमाणपत्र | | | |
| १७.१० | | | | |

टिप - वरील कागदपत्रे स्वतः सांक्षाकित करुन सादर करावे.

स्थळ -

दिनांक - उमेदवारांचे नाव व स्वाक्षरी